ePaper

# अखेर ठरले! आशीष देशमुख यांचे भाजपमध्ये पुनरागमन



| वर्ष - 7 । अंक -49 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- राष्ट्रवादी महिला काँग्रेसचा कँडल मोर्चा!
- पालखी सोहळ्यानिमित्त पुढील ३ दिवस वाहतुकीत बदल
- ‘सीएमई’ हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला संरक्षण विभागाचा ‘हिरवा कंदील’!


www.mahaenews.com | ।गुरुवार, दि. 15 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# थकीत कर न भरल्यास महापालिकेकडून येत्या पंधरा दिवसांत जप्तीची कारवाई!

## गत वर्षीच्या शंभर जप्त मालमत्तांचा दोन महिन्यात लिलाव

### 39 हजार 655 मालमत्ता धारकांकडे तब्बल साडेसहाशे कोटी रुपयांचा कर थकीत

**।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहरातील 31 मार्च 2023 अखेर 50 हजारापेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्या मालमत्ता महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या रडारवर आल्या आहेत. 39 हजार 655 मालमत्ता धारकांकडे तब्बल साडेसहाशे कोटी रुपयांचा कर थकीत आहे. हा कर वसूल करण्यासाठी सुरुवातीस एसएमएस, कॉलिंगद्वारे आवाहन केले जाणार आहे. त्यानंतरही थकीत कर न भरल्यास येत्या पंधरा दिवसांत जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचा गर्भित इशारा महापालिकेच्या वतीने देण्यात आला आहे. तसेच गत वर्षीच्या शंभर जप्त मालमत्तांचा दोन महिन्यात लिलावही करण्याचे नियोजन पालिकेने केले आहे.**

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून थकीत कर असलेल्या मालमत्ता धारकांच्या कराची वसुली करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. गतवर्षी या विभागाने सुमारे साडेतीनशे कोटी थकीत असलेला कर वसूल केला आहे. तसेच या विभागाने 2023-24 या आर्थिक वर्षात 1 हजार कोटींचे टार्गेट ठेवले आहे. हे टार्गेट पूर्ण करण्यासाठी सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख आणि त्यांची संपूर्ण टीम सातत्याने कार्यरत आहे. जुना थकीत कर जास्तीत जास्त प्रमाणात कसा वसूल होईल, यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

सिध्दी प्रकल्पाअंतर्गत जवळपास शंभर टक्के बिलांचे यशस्वी वाटप झाल्यानंतर पालिकेने आता आपला थकबाकीदार मालमत्तांकडे मोर्चा वळवला आहे. 1 लाखांपेक्षा जास्त मालमत्ता कर थकीत असलेल्या 22 हजार मालमत्ता धारकांना 2023-24 या आर्थिक वर्षाच्या कराच्या बिलाबरोबरच जप्ती पूर्व नोटीसा बजावल्या आहेत.

39 हजार 655 मालमत्ता धारकांकडे 647 कोटी 62 लाख 40 हजार रुपयांचा कर थकीत आहे. यामधील 1826 मालमत्ता धारकांनी 15 कोटी 71 लाख, 1180 मालमत्ता धारकांनी पार्ट पेमेंट करून 7 कोटी 58 लाख रुपयांचा भरणा केला आहे.



### 30 जून 2023 अखेर मिशन 400 कोटी...

2022-2023 मध्ये संपूर्ण कराचा भरणा केलेल्या मात्र यावर्षी अद्यापि मालमत्ता कराचा भरणा न केलेल्या मालमत्ताधारकांना कस्टम एसएमएस तसेच IVRS प्रणालीचा वापर करुन प्रिरेकॉर्डेड कस्टम कॉलद्वारे संपर्क केला जाणार आहे. गतवर्षी संपूर्ण कराचा भरणा केलेल्या मालमत्ताधारकांना सवलत योजनेसह कराचा भरणा करणेस प्रवृत्त करणेकामी विभागीय कार्यालयाकडील गटप्रमुख यांचेमार्फत मोबाईल ऍपचा वापर करून टेली कॉलिंग केले जाणार आहे. शहरातील रहदारीच्या व मोक्याची ठिकाणे ठिकाणी आकर्षक व लक्षवेधक कंटेंट असलेल्या होर्डींग्ज द्वारे प्रसिध्दी केली जाणार आहे. सर्वाधिक थकबाकीदार असलेले शहरातील भाग निश्चित करुन सदर परिसरात पॅम्पलेट तसेच रिक्षांवर लाऊड स्पिकर द्वारे प्रसिध्दी करणे उपक्रम राबवून 30 जून अखेर 400 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.

### मोबाईल ॲपमध्ये आता जप्ती मीटर...

प्रकल्प सिद्धीसाठी जे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले होते. त्यात आता जप्ती मीटर हे नवीन फिचर उपलब्ध करून देण्यात आले आहे. हे फिचर फिल्डवर काम करणाऱ्या गट लिपिक आणि मंडल अधिकारी यांच्या जप्ती पथकासाठी तयार केले आहे. त्यांच्या सगळ्या जप्ती कारवाईची नोंद या जप्ती मीटरमध्ये होणार आहे. त्यांनी थकबाकीदार यांना दिलेल्या एकूण भेटी, प्रत्येक भेटीत त्यांना थकबाकीदार यांच्याकडून मिळालेला प्रतिसाद, त्यांनी केलेले वायदे इत्यादी नोंद होणार आहे. त्यामुळे कुठला थकबाकीदार कसा आणि किती प्रतिसाद देतो आहे याचे विश्लेषण करता येणार आहे. त्यातून जप्ती आणि नंतर ज्यांची आर्थिक क्षमता असताना जाणीवपूर्वक कर न भरणाऱ्या लोकांच्या मालमत्तांची जप्ती आणि लगेचच लिलाव प्रक्रिया हाती घेतली जाणार आहे.

### गत वर्षी जप्त केलेल्या शंभर मालमत्तांचा यंदा लिलाव होणार

गतवर्षी सुमारे दोन हजार मालमत्ता जप्त किंवा सील करण्यात आल्या आहेत. त्यातील काही मालमत्तांनी आपला थकीत कर भरला आहे. मात्र अद्यापि काही मालमत्ता धारकांनी आपला थकीत कर भरलेला नाही. अशांपैकी निवडक शंभर मालमत्ता निवडण्यात आल्या आहेत. त्यात निवासी, बिगर निवासी तसेच औद्योगिक अशा मालमत्तांचा समावेश आहे. त्यांची या वर्षी लिलाव प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. यासाठी गेल्या वर्षी माननीय आयुक्त यांनी सविस्तर धोरण ठरवून दिले आहे. त्या धोरणातील नियमानुसार कायदेशीर प्रक्रिया राबवली जाणार आहे. यासाठी मनपा कायद्यातील सर्व तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.



“ कर संकलन विभागाची जप्ती कारवाई ही लॉजिकल एण्डला नेण्यात येणार आहे. त्यासाठी गेल्या वर्षी मा. प्रशासक यांच्या मान्यतेने लिलाव धोरण ठरवून दिले आहे. त्याचे तंतोतंत पालन करण्याच्या विभागाला सूचना दिल्या आहेत. मी आखून दिलेल्या त्रिसूत्रीपैकी निरंतर जप्ती कारवाई हे एक सूत्र आहे. त्यासाठी कर संकलन विभागाला समर्पित स्वरूपात एम एस एफ जवान उपलब्ध करून देण्यात आले आहेत. येत्या पंधरा दिवसात जप्तीची धडक कारवाई सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**– शेखर सिंह,** आयुक्त पिंपरी-चिंचवड महापालिका



“ येत्या वर्षभरात कर संकलन विभागाचे काय नियोजन असणार आहे. त्यात करदात्या नागरिकांच्या विविध शंकांचे समाधान यासाठी या महिन्याचा कर संवाद हा कार्यक्रम चौथ्या शनिवारी आयोजित न करता तिसऱ्या म्हणजेच येत्या शनिवारी 17 तारखेला सकाळी साडेअकरा वाजता आयोजित करण्यात आला आहे. त्यात नागरिक त्यांना असलेल्या शंका विचारू शकतात. त्यामुळे त्यांना 30 जूनपूर्वी आपला कर भरण्यास आणि त्यांना लागू असलेली सवलत मिळवण्यास मदत होईल. नागरिक यात ऑनलाईन किंवा ऑफलाईन उपस्थित राहू शकतात. सर्व प्रशासन अधिकारी आणि मंडल अधिकारी त्यावेळी मुख्य कार्यालयात हजर असणार आहेत.

**– नीलेश देशमुख,** सहायक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

## ब्रीजभूषण सिंह यांच्या विरोधात तहसील कार्यालय बाहेर घोषणा

# राष्ट्रवादी महिला काँग्रेसचा कॅंडल मोर्चा!

### » तातडीने कारवाई व्हावी, महिला कुस्तीपटूंना न्याय मिळावा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महिला कुस्तीपटूवर झालेल्या अन्याया विरोधात न्याय मिळावा आणि कुस्ती महासंघाचे अध्यक्ष खासदार ब्रीजभूषण सिंह यांच्यावर तातडीने कारवाई होण्यासाठी शहर राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टीच्या वतीने निगडी चौक तहसील कार्यालय बाहेर कॅंडल मोर्चा काढण्यात आला.**



यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महिला अध्यक्ष प्रा. कविता आल्हाट, युवक अध्यक्ष इम्रान शेख, कार्याध्यक्ष कविता खराडे,भोसरी विधानसभा अध्यक्ष ज्योती तापकीर, युवक स्वयंरोजगार प्रदेशाध्यक्ष मेघा पवार, अर्बन सेल अध्यक्ष मनीषा गटकळ, उपाध्यक्ष पूनम वाघ सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष गंगा धेंडे सेल अध्यक्ष निर्मला माने, वंदना जाधव ,मेघा पळशीकर जया गवळी, विजया काटे,विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

#### समाजात वेगळा संदेश जातोय – प्रा. आल्हाट

गेल्या तीन महिन्यांपासून महिला कुस्तीपटू न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र केवळ वेळकाढूपणाचे धोरण राबवले जात आहे.अद्यापही आरोप झालेल्या ब्रिजभूषण सिंह यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. यामुळे सर्वसामान्य महिलांच्या प्रश्नांना किती न्याय मिळेल असा प्रश्न उपस्थित होत आहे. महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्यावर कारवाई न झाल्यास समाजात यामुळे वेगळा संदेश जाण्याचा जाण्याची भीती आहे.

---

# विविध प्रकल्प सल्लागारांवर लाखोंचा चुराडा!

### » खर्च करूनही प्रकल्प अपूर्ण, पिंपरी-चिंचवड महापालिकेतील प्रकार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने विविध प्रकल्प वेगाने राबविण्यासाठी विविध सल्लागार नेमले आहेत. त्यांच्या मानधनासाठी महापालिका दर महिन्याला २८ लाख रुपये खर्च करीत आहे. मात्र, खर्च करूनही बहुतांश प्रकल्प मुदतीमध्ये पूर्ण झालेले नाहीत, परिणामी, प्रशासनावर त्यांना मुदतवाढ देण्याची नामुष्की ओढविली आहे.**

महापालिकेच्या मोठ्या व महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती मिळावी, म्हणून तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी 'सिटी टान्फॉर्मेशन ऑफिस' (सीटीओ-शहर परिवर्तन कार्यालय) ही नवी संकल्पना सुरू केली. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागारांचा सल्ला घेऊन कामे मुदतीमध्ये पूर्ण करण्यासाठी 'सीटीओ'ची निर्मिती झाली. त्यासाठी 'पॅलेडियम' या एजन्सीची दोन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली. ही एजन्सी जानेवारी २०१८पासून महापालिकेत काम करीत आहे. महापालिकेकडून एजन्सीच्या नऊ कर्मचाऱ्यांना दरमहा २२ लाख बिल देण्यात आले. दोन वर्षांची मुदत २०१९ला संपल्याने एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर दोन वर्षांसाठी निविदा काढण्यात आली. यामध्ये हीच एजन्सी पात्र ठरली आहे. मात्र, ही मुदत संपल्यानंतरसुद्धा पुन्हा एक वर्ष मुदतवाढ देण्यात आली आहे. सध्या १० कर्मचारी काम करीत आहेत.



#### सल्लागारांना पालिकेचे ओळखपत्र

सुटाबुटात व हातात लॅपटॉप घेऊन महापालिकेत इकडून तिकडे वावरताना काही तरुण व तरुणी दृष्टीस पडतात. कॉर्पोरेट कंपनीचे हे कर्मचारी महापालिकेचे ओळखपत्र घालून फिरतात. दैनंदिन कामकाजास अडथळा निर्माण होऊ नये, म्हणून त्यांना पालिकेचे ओळखपत्र देण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. महापालिकेच्या स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, बीआरटी, क्रीडा, उद्यान, प्रकल्प व इतर विभागांच्या कामांसाठी असंख्य सल्लागार नेमले आहेत.

#### 'सीटीओ'ची जबाबदारी

**» 'महापालिकेच्या कामांचे सादरीकरण करणे, डाटा गोळा करणे, राज्य व केंद्राशी इंग्रजीत पत्रव्यवहार करणे आदी कामे 'सीटीओ' करीत आहे,' असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हे अधिकारी आयुक्तांच्या सूचनानुसार महापालिकेत काम करतात. मात्र, दर वर्षी कोट्यवधींचा खर्च करूनही कामे मुदतीमध्ये पूर्ण होत नसल्याने अनेक प्रकल्पांना मुदतवाढ देण्याची नामुष्की प्रशासनावर ओढविली आहे. त्यामुळे कोट्यवधींचा खर्च करूनही 'सीटीओ'चा महापालिकेस किती फायदा होतो, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.**

"केंद्र व राज्य किंवा सरकारी व खासगी संस्थेची स्पर्धा, अभियान, प्रकल्प, योजना आदींसाठी 'सीटीओ' आवश्यक कागदपत्रे तयार करून मेलद्वारे तातडीने पत्रव्यवहार करते. महापालिकेचे मनुष्यबळ कमी असल्याने; तसेच इंग्रजी भाषेच्या अडचणीमुळे वेळ जातो. मात्र, हे लोक वेगात काम करतात. त्यांच्याकडे अद्ययावत तंत्रज्ञान व माहिती असल्याने व तज्ज्ञ मंडळी असल्याने नवीन संकल्पना राबविणे सुलभ होते.

**- नीळकंठ पोमण,**
मुख्य अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान

# भोसरीतील ‘शासन आपल्या दारी’ उपक्रमाला मुदतवाढ!

## पिंपरी-चिंचवडच्या तहसीलदार डॉ. अर्चना निकम यांचे आवाहन

### कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथील कार्यक्रमाऐवजी मिळणार घरपोच दाखले

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदार संघात प्रशासनाच्या वतीने राबवलेल्या “शासन आपल्या दारी” उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. अवघ्या १५ दिवसांमध्ये सुमारे ९ हजाराहून अधिक अर्ज दाखल झाले आहेत. राज्य शासनाच्या निर्देशानुसार दि.३० ऑगस्टपर्यंत या उपक्रमाला मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे दि.१५ जून रोजी नियोजित केलेल्या कार्यक्रमाला स्थगिती देण्यात येत आहे, अशी माहिती पिंपरी-चिंचवडच्या तहसीलदार डॉ. अर्चना निकम यांनी दिली.**




राज्य सरकारने ‘शासन आपल्या दारी’ हा उपक्रम हाती घेतला आहे. त्यामाध्यमातून विधानसभा मतदार संघनिहाय दाखले वाटप कार्यक्रम घेण्यात येत आहेत. भोसरी विधानसभा मतदार संघात दि.१ जून २०२३ ते दि.१५ जून २०२३ या कालावधीत हा उपक्रम राबवण्याचे नियोजित आहे. नागरिकांनी उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

दरम्यान, राज्य सरकारच्या निर्देशानुसार, ‘फर्स्ट इन... फर्स्ट आऊट’ या सूत्रानुसार दाखल्यांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच, सर्व्हर डाउन आणि दाखले वाटप करण्यासाठी प्रणालीत केलेला बदल तसेच, उपक्रमाला मिळालेली मुदतवाढ या अनुशंगाने दि. १५ जून रोजी कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी येथे नियोजित दाखले वाटप कार्यक्रम रद्द केला आहे.

तसेच, भोसरी विधानसभा मतदार संघात जुलै- २०२३ मध्ये आधार कार्ड, मतदान कार्ड संबंधित, श्रावण बाळ योजना तसेच संजय गांधी निराधार योजना याबाबत गावनिहाय कॅम्प लावण्यात येणार आहेत, असेही डॉ. अर्चना निकम यांनी सांगितले.

> “ भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये गेल्या १५ दिवसांपासून शासन आपल्या दारी उपक्रम प्रभावीपणे राबवला जात आहे. या उपक्रमाला राज्य शासनाकडून मुदतवाढ मिळाली असून, संबंधित दि. १५ जून २०२३ रोजी कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी या ठिकाणी नियोजित दाखले वाटप कार्यक्रम स्थगित केला आहे. आम्ही तसदीबद्दल दिलगिरी व्यक्त करीत आहोत. सदर लाभार्थींना पुढील १५ दिवसांमध्ये दाखल्यांचे वाटप घरपोच करण्यात येणार आहे. तसेच, जुलै महिन्यात गावनिहाय कॅम्प लावण्यात येणार आहे.
>
> – **डॉ. अर्चना निकम,** तहसीलदार, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरीतील सेवा विकास सहकारी बँकेचा लेखा परीक्षण अहवाल रद्द

## नव्याने चाचणी लेखापरीक्षण करण्याचे सहकार आयुक्तांना आदेश

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरीतील दि-सेवा विकास सहकारी बँकेचा चाचणी लेखापरीक्षण अहवाल हा एकतर्फी, पक्षपाती व नैसर्गिक न्याय तत्वांचा भंग करणारा असल्याचा ठपका ठेवत सहनिबंधकांचा १२ जून व १ जुलै २०१९ रोजीचा तपासणी अहवाल आणि ६ ऑगस्ट २०२१ रोजीचा चाचणी लेखापरीक्षण अहवाल रद्द करण्यात आले आहेत. बँकेचे सन २०१६-१७, २०१७-१८ या वर्षाचे नव्याने चाचणी लेखापरीक्षण करण्याचे आदेश सहकार मंत्री अतुल सावे यांनी पुणे सहकार आयुक्तांना दिले आहेत.**



बँकेच्या माजी संचालिका दया मूलचंदानी यांनी बँकेच्या २०१६-१७, २०१७-१८ या वर्षाच्या चाचणी लेखापरिक्षणाच्या आदेशाविरोधात सहकार मंत्र्यांकडे अपिल दाखल केले होते. हेतू ठेवून आणि बँकेला बदनाम करण्याच्या दृष्टीने लेखापरीक्षण अहवाल केल्याचा आरोप त्यांनी केला होता. या अपिलावर सहकार मंत्र्यांनी सुनावणी घेतली. साखर आयुक्तालयातील सहनिबंधक यांच्याकडील पुरेसा कारभार विचारात घेता त्यांची लेखापरिक्षणासाठी नियुक्ती करू नये असे साखर आयुक्तांनी लेखी कळवूनही सहकार आयुक्तांनी त्यांची नेमणूक केली. त्यांनी तक्रारदाराला सोयीचा अहवाल दिला, हा आक्षेप योग्य आहे. सहकार आयुक्त कार्यालयात लेखापरीक्षण हे पद असतानाही, साखर आयुक्तांचा विरोधात डावलून साखर आयुक्तालयातील सहनिबंधक जाधवर यांची लेखापरीक्षण करण्यासाठी नियुक्ती का? करण्यात आली याची कोणतीही वाजवी कारणीमीमांसा सहकार आयुक्तांकडून करण्यात आली नाही. आदेशात आणि युक्तिवादातही कारणीमीमांसा केली नाही. सर्व खाती ही फसवणुकीची खाती म्हणून गणना करायचीच असा हेतू ठेवून लेखापरिक्षणाचे कामकाज केल्याचा ठपकाही आदेशात ठेवण्यात आला आहे.

# पिंपरी-चिंचवड शहराचा पाणीपुरवठा आज बंद राहणार

। पिंपरी । महाईन्यूज ।



रावेत येथील अशुद्ध जलउपसा केंद्रातील विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी उद्या गुरुवारी (दि.१५ जून) रोजी पाणीपुरवठ्याची यंत्रणा बंद ठेवण्यात येणार आहे. गुरुवारी सकाळचा पाणीपुरवठा केल्यानंतर दुरुस्तीच्या कामामुळे सायंकाळाचा पाणीपुरवठा होणार नाही. शुक्रवारी (दि.१६ जून) सकाळचा पाणीपुरवठा विस्कळीत राहणार असल्याची माहिती सह शहर अभियंता श्रीकांत सवणे यांनी दिली. महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या रावेत येथील अशुद्ध जलउपसा केंद्रातील विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे, सेक्टर २३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्र विद्युत पुरवठा विषयक व पाणीपुरवठा विषयक नियमित देखभाल दुरुस्तीची आवश्यक कामे, शहरातील पाणी वितरण व्यवस्थेतील दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी गुरुवारी शहरातील पाणीपुरवठ्याची यंत्रणा बंद ठेवण्यात येणार आहे. महापालिकेमार्फत गुरुवारी सकाळचा पाणीपुरवठा केला जाईल. परंतु त्यानंतर दुरुस्तीच्या कामामुळे शहरातील सर्व भागांचा सायंकाळाचा पाणीपुरवठा होणार नाही. दुरुस्तीच्या कामासाठी पाणीपुरवठ्याची सर्व यंत्रणा बंद ठेवल्यामुळे शहरातील सर्व भागात दुस-या दिवशी म्हणजेच शुक्रवारी सकाळचा पाणीपुरवठा विस्कळीत राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे.



भूमिका

निलेश दुटाळ
91- 87668 40811

# मुलांपुढे सकारात्मक सूचनांचा वापर करा !

**आपल्या देशात कोणत्याही गोष्टींचे प्रशिक्षण मिळते मात्र मुलांचे संगोपन कसे करावे याचा अजून कोणताही कोर्स तयार झाला नाही. संगोपन कसे करावे याच्या टिप्स देणारी असंख्य पुस्तके बाजारात मिळतात परंतु ते वाचून कुणी उत्तम संगोपन केले याचे दाखले मात्र मिळत नाहीत. पुस्तकी ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव यात मोठा फरक असतो. ज्यांनी संगोपनाचा अनुभव घेतला त्यांनी लिहिलेले पुस्तक कदाचित अधिक प्रभावी ठरू शकेल.**

मुलांचे संगोपन हा वरवर दिसणारा साधा विषय नाही. अनेकांचा या विषयालाच आक्षेप असतो ,मुलांचे संगोपन हा काही विषय होऊ शकत नाही ,आजवर काय हा विषय डोळ्यापुढे ठेवून संगोपन झाले काय ? असा प्रतिप्रश्न लोक करीत असतात. मुलांचे संगोपन हा शिकण्याचा नव्हे तर वात्सल्य आणि जबाबदारीचा भाग असल्याचे अनेक लोक मानतात. आताच्या काळात दोन्ही विचारसरणी सरसकट नाकारता येणार नाहीत.

कोणताही नवा विचार पुढे आला की समाज असाच त्यावर प्रतिक्रिया देत असतो. लैंगिक शिक्षणावर हेच लोक चवताळून प्रश्न करतात की कशाला हवा लैंगिक शिक्षण हा विषय ? त्याची आम्हाला माहिती नसताना आमचे कुठे काही अडले ? आम्हाला मुले झालीच की नाही ? आमचे व्यवस्थित सुरु आहे की नाही ? मग कशाला हवे लैंगिक शिक्षणाचे चोचले ? लोकांना आपण काहीतरी चूक करून बसलो आहोत किंवा आपण करतो आहोत ते अयोग्य आहे हे कुणी लक्षात आणून दिलेले पटत नसते. आधुनिक जगातील लैंगिक जाणिवा आणि आधीचे कामजीवन



यात पुष्कळ फरक होता हेच त्यांना मान्य नसते. आधुनिक जगाच्या लैंगिक जीवनात स्त्रीच्या भावनांचा विचार करण्यात आला आहे ,जुन्या लैंगिक जीवनात केवळ पुरुषांचा मूडच लक्षात घेतला गेला होता हा फरक ज्यांच्या लक्षात येतो असे लोक जुन्यापेक्षा आधुनिक कामजीवन स्वीकारत असतात हे लक्षात घ्यायला हवे.

मुलांचे संगोपन आणि त्यांच्यावर संस्कार करताना अनेक पालकांना प्रामुख्याने आईला मुलांच्या समोर नकारात्मक बोलण्याची सवय असते. मुलांनी सगळ्या पालेभाज्या आणि पदार्थ खायला हवेत असे असताना आई मात्र " त्याला ना अमुक भाजी अजिबात आवडत नाही,काही केल्या तो खातच नाही " काही मुलांना मोबाईलचे व्यसन पालकच लावतात आणि वरून अभिमानाने सांगत असतात की ही ना , मोबाईल शिवाय अजिबात राहत नाही,दिला नाही तर घरभर आकांडतांडव करते. ही सगळी तारीफ मुलांच्या समोरच सुरु असल्याने मुले हे सगळं ग्रहण करीत असतात. आई,बाबा म्हणतात ना,की मला अमुक भाजी आवडत नाही म्हणून मग मुले त्या भाज्या किंवा पदार्थ नावडत्या यादीत टाकून देतात. अश्याच प्रकारच्या अनेक गोष्टी असतात की ज्या त्यांच्या समोर पालक नकारात्मक पद्धतीने मदत असतात ,त्याचा उलटा परिणाम मुलांच्या सवयींवर होत असतो पुढे त्याची मोठी किंमत पालकांना चुकवावी लागते.

वयाच्या शून्य ते सहा या मुलांना पालक जसे घडवतील तसे ते घडत असतात. आपण केलेल्या कृतीची आई नेहमी स्तुती करते हे मुलांच्या डोक्यात बसलेले असते अश्यावेळी त्यांच्या चांगल्या कृतीची सगळ्यांच्या पुढे स्तुती करायला हवी. " आमची छकुली ना कोणतीही भाजी आवडीने खाते,तिला मी केलेल्या सगळ्या भाज्या आवडतात.

" आमचा पिंटू बाहेर कुठे सोबत गेल्यावर अजिबात काहीही घेऊन मागत नाही ,तो बाकी मुलांपेक्षा खूपच शांत आणि समजदार आहे. अश्या सकारात्मक सूचना दिल्या तर मुलांच्या मेंदूवर त्या कोरल्या जातात. अनेक मुलांना सोबत दिलेला डबा अर्धवट खाण्याची सवय असते अश्यावेळी दररोज त्याची स्तुती करायला हवी की आमचा बबड्या दररोज डबा फिनिश करतो, काहीही ठेवत नाही. त्याच्या उणिवा गौरव म्हणून त्याच्यापुढे सादर होणार नाहीत याची काळजी घ्यायला हवी तरच मुले पालकांना अपेक्षित अशी कृती करायला लागतात.

मुलांमधील जे अवगुण तुम्हाला काढायचे आहेत असे वाटते त्यांची यादी करून त्या वाक्यांच्या सकारात्मक सूचना मुलांना द्यायला सुरुवात करा, त्याचा काही दिवसात सुंदर परिणाम होईल. मुले घरात असताना तुम्ही इतरांशी कसे बोलता, नवऱ्याशी कसे बोलता किंवा कुणाशी कसे वर्तन करता याचे मुले सूक्ष्म निरीक्षण करीत असतात. मुलांसमोर ज्या बायका नवऱ्याचा सतत अपमान करीत असतात, त्यांची मुले पुढे पित्याचा फारसा सन्मान ठेवत नाहीत. मुलांवरील संस्कार ही परतफेडीची सायकल असते .त्यांच्यावर केलेले कोणतेही संस्कार काही वर्षातच आपल्याला विविध रूपाने परत मिळत असतात त्यामुळे मुलांपुढे किंवा त्यांच्या विषयी बोलताना नेहमी सकारात्मक बोलावे. पालक खोटे किंवा वाईट वागत असतील आणि मुलांना खरे आणि चांगले वागण्याची शिकवण देत असतील तर मुलांना त्यातला अंतर्विरोध लक्षात येतो त्यामुळे पालकांनी नेहमी आनंदी आणि सकारात्मक वातावरण ठेवायला हवे.

## संपादकीय »

### संस्कृतीच्या राजकारणात

***चीनला केवळ जगातली एकमेवाद्वितीय महासत्ता व्हायचे नाही. चीनला आपली संस्कृती साऱ्या जगाच्या अंगणात खेळवायची आहे. आपला बुद्धिझम जगाला शिकवायचा आहे. युरोपच्या लोकशाहीच्या गप्पांनी चीन कधीही विचलित होत नाही.***

आपली राज्यव्यवस्था हीच अंतिमत: मानवी हिताची आहे, अशी चिनी राज्यकर्त्यांची श्रद्धा आहे. तीही त्यांना जगभर न्यावयाची आहे.

शी जिनपिंग यांना स्वप्ने पडतच असतील तर, ते स्वत: जगाचे नियंते झाले आहेत, अशी पडत असतील. त्यामुळेच, अर्धवटराव डोनाल्ड ट्रम्प यांनी 'युनेस्को' (युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक, अँड कल्चरल ऑर्गनायझेशन) या पॅरिसमध्ये मुख्यालय असणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या महत्त्वपूर्ण संस्थेशी काडीमोड घेतल्यापासून चीनने या संस्थेकडे खास लक्ष पुरविले होते. 'सांस्कृतिक उपक्रमां'साठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही, असे चीनने युनेस्कोला सांगितलेही होते. अर्थात, युनेस्कोच्या अर्थसंकल्पात वीस टक्के वाटा एकट्या अमेरिकेचा असतो. त्यामुळे, हा खड्डा भरून काढणे, सोपे नव्हते.

**पृष्ठवंशीय प्राण्यांमधील वैकल्पिक निशुक्रजनन पुनरुत्पादन पद्धतींचा अभ्यास प्राणीशास्त्रज्ञ मागील दोन दशकांपासून करत आहेत. नराशी मीलन न होताच मादीने अंडी घालण्याची किंवा संततीला जन्म देण्याची पद्धत पक्षी, सरीसृप प्राणी, काही मासे यांच्यामध्ये आढळते.**

## मगरीमधील निशुक्रजनन

पृष्ठवंशीय प्राण्यांमधील वैकल्पिक निशुक्रजनन पुनरुत्पादन पद्धतींचा अभ्यास प्राणीशास्त्रज्ञ मागील दोन दशकांपासून करत आहेत. नराशी मीलन न होताच मादीने अंडी घालण्याची किंवा संततीला जन्म देण्याची पद्धत पक्षी, सरीसृप प्राणी, काही मासे यांच्यामध्ये आढळते. पृष्ठवंशीय प्राण्यांमधील वैकल्पिक निशुक्रजनन पुनरुत्पादन पद्धतींचा अभ्यास प्राणीशास्त्रज्ञ मागील दोन दशकांपासून करत आहेत. नराशी मीलन न होताच मादीने अंडी घालण्याची किंवा संततीला जन्म देण्याची पद्धत पक्षी, सरीसृप प्राणी, काही मासे यांच्यामध्ये आढळते. अशाच प्रकारचे पुनरुत्पादन मगरीमध्ये प्रथमच दिसून आले आहे. कोस्टा रिकामधील एका प्राणिसंग्रहालयातील एका मगरीच्या सन २०१८मधील निरीक्षणांचा तपशीलवार अभ्यास केला असता, ही माहिती समोर आली आहे. सोळा वर्षे या प्राणिसंग्रहालयात असलेल्या या मगरीने २०१८मध्ये १४ अंडी घातली होती. त्यामधील एका अंड्यात पूर्ण विकसित झालेले, मात्र मृत भ्रूण होते. हे भ्रूण जनुकीयदृष्ट्या मातेशी ९९.९ टक्के साधर्म्य साधणारे होते. मात्र, नराशी मीलन न होताच अंडी घालण्याची म्हणजेच, निशुक्रजननाची मगरींमधील ही पहिलीच ज्ञात घटना असल्याचे व्हर्जिनिया पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट आणि अमेरिकेतील स्टेट युनिव्हर्सिटीतील अभ्यासकांनी नोंदवले.



'बायोलॉजी लेटर्स' या विज्ञानपत्रिकेत हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. सजीवांमध्ये लैंगिक पद्धतीने म्हणजेच नर व मादी पालकांच्या मिलनाने आणि द्विखंडन, मुकुलन आदी अलैंगिक पद्धतीने अशा दोन प्रकारे पुनरुत्पादन केले जाते. प्रारंभीचे जीव अलैंगिक पद्धतीने स्वत:चे क्लोन असलेले जीव निर्माण करत. यात जनुकीयदृष्ट्या समान असलेले अनेक जीव तयार होतात. मात्र, जनुकीय वैविध्याअभावी ते परिस्थितीशी जुळवून घेऊ शकत नाहीत. मानवासारख्या प्रजातीमधील लैंगिक पुनरुत्पादनामध्ये दोन्ही जन्मदात्यांची जनुके आल्यामुळे जनुकीय वैविध्य असलेले जीव जन्माला येतात, ते बदलत्या स्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम असतात. त्यामुळे अधिक

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अखेर ठरले! आशीष देशमुख यांचे भाजपमध्ये पुनरागमन!

## » 18 जून रोजी दिवशी गडकरी-फडणवीसांच्या उपस्थितीत होणार प्रवेश

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेसमधून नुकतेच निलंबित झालेले माजी आमदार आशिष देशमुख पुन्हा एकदा भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. १८ जून रोजी कोराडी येथील नैवेद्यम नॉर्थ स्टारमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत प्रवेश होणार आहे. देशमुख ६ वर्षांनंतर पुन्हा एकदा मायदेशी परतत आहेत. देशमुख सावनेर मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवण्याची शक्यता भाजपकडून व्यक्त केली जात आहे.**



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आशीष देशमुख यांचा भाजपमध्ये प्रवेश होणार आहे. १८ जून रोजी ते भाजपत प्रवेश करतील.

उल्लेखनीय म्हणजे २००९ मध्ये त्यांनी सावनेर विधानसभा मतदारसंघातून भाजपच्या वतीने निवडणूक लढवली होती, त्यात त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते, त्यानंतर २०१४ मध्ये काटोलमध्ये त्यांनी काका अनिल देशमुख यांच्याविरोधातही निवडणूक लढवली होती. ज्यामध्ये ते विजयी झाले होते.

आमदारकीची निवडणूक लढवून आशिष देशमुख विधानसभेत पोहोचले होते. मात्र नेहमीप्रमाणेच वादग्रस्त वक्तव्यांमुळे भाजपच्या मुसक्या आवळल्याने त्यांना राजीनामा द्यावा लागला. भाजपचे आमदार असतानाही ते भाजप नेतृत्वावर जोरदार टीका करत असत. त्यानंतर काँग्रेसमध्ये प्रवेश केला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी दक्षिण पश्चिम विधानसभेतून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात निवडणूक लढवली, त्यात त्यांचा पराभव झाला. गेल्या काही महिन्यांपासून काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांविरोधात सातत्याने वक्तव्ये सुरू होती. त्यामुळे काँग्रेसच्या शिस्त व्यवस्थापन समितीने त्यांच्यावर कारवाई करून त्यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. पक्षाच्या शोधात भाजप पुन्हा एकदा नेत्यांच्या जवळ आला.

### काही नेत्यांचा विरोध

**»जाणकारांच्या मते, आशिष देशमुख यांच्या पक्षप्रवेशाला वरिष्ठ नेत्यांनी हिरवा कंदील दिला असेल, पण त्यांना स्थानिक नेत्यांनी कडाडून विरोध केला होता. त्यामुळे त्यांच्या पक्षप्रवेशाला उशीर झाला. स्थानिक नेत्यांना शांत केल्यानंतर आता १८ जून हा प्रवेशाचा शुभ मुहूर्त निश्चित करण्यात आला आहे. उल्लेखनीय म्हणजे महिनाभरापूर्वी आशिष देशमुख यांनी त्यांचे वडील आणि काँग्रेस नेते रणजित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त सावनेर येथे आयोजित कार्यक्रमात सावनेर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचे संकेत दिले होते.**

---

# तमिळनाडू सरकारकडून CBI ची 'नाकाबंदी'!

। मुंबई । महाईन्यूज

तमिळनाडू सरकारने सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभाग या तपास यंत्रणेबद्दल मोठा निर्णय घेतला आहे. तमिळनाडू सरकारने सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभाग या तपास यंत्रणेबद्दल मोठा निर्णय घेतला आहे. तमिळनाडू राज्यातील कोणत्याही गुन्ह्याबाबत तपास करण्याआधी सीबीआयला आता राज्य सरकारची पूर्व परवानगी घ्यावी लागणार आहे. राज्यात परवानगीशिवाय प्रवेश करण्यास सीबीआयवर बंदी घातली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे सीबीआयला तमिळनाडूत थेट कोणतीही कारवाई करता येणार नाही. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्या सरकारने बुधवारी हा निर्णय घेतला आहे. सीबीआयला आता कोणत्याही प्रकरणात तपासासाठी तामिळनाडूत



येण्यापूर्वी राज्य सरकारची परवानगी घ्यावी लागणार आहे. तमिळनाडूआधी पश्चिम बंगाल, राजस्थान, केरळ, मिझोराम, पंजाब, तेलंगणा या नऊ राज्यातील राज्य सरकारांनी असा निर्णय घेतला आहे. अलीकडच्या काळात सीबीआयकडून सातत्याने विरोधी पक्षांच्या नेत्यांवर कारवाई केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपाची सत्ता नसलेल्या राज्यांकडून हा निर्णय घेण्यात येत आहे. तमिळनाडू सरकारने राज्यांनी केंद्रीय अन्वेषण विभागाला तपासासाठी दिलेली सर्वसाधारण संमती मागे घेतली आहे.

---

# शिराळा तालुक्यातील पहिली 'स्वराज्य संवाद' सभा बिळाशीत!

## » जिल्हा समन्वयक राम पाटील : क्रांतीकारकांच्या गावातून अभियानाची सुरवात ही अभिमानाची बाब!

। शिराळा । महाईन्यूज

**बिळाशी या गावाला ऐतिहासिक वारसा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांविरोधात लढा पुकारुन या गावात क्रांतीची ज्योत पेटवण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची स्थापना करुन ज्याप्रमाणे रयतेचे राज्य निर्माण व्हावे. याकरिता याच गावातून 'इन्कलाब झिंदाबाद' चा नारा दिला गेला. त्याप्रमाणे आपचे संस्थापक व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केरजीवाल यांच्या संकल्पनेतून सर्वसामान्य नागरिकांचे 'स्वराज्य' निर्मितीसाठी 'स्वराज्य संवाद' आयोजित केला आहे, असे मत आपचे सांगली जिल्हा समन्वयक राम पाटील यांनी व्यक्त केले.**



आम आदमी पार्टीच्या माध्यमातून शिराळा तालुक्यातील पहिली 'स्वराज्य संवाद' सभा बिळाशीत झाली. यावेळी राम पाटील बोलत होते.

राम पाटील म्हणाले की, आम आदमी पार्टी तर्फे सांगली जिल्ह्यामध्ये सर्वत्र स्वराज्य संवाद सभा आयोजित करण्यात येत आहेत. शिराळा तालुक्यामध्ये ऐतिहासिक वारसा असलेले आणि क्रांतिकारकांचे गाव म्हणून ओळख असणारे बिळाशी या गावातून आम आदमी पार्टीच्या संवाद स्वराज्य संवाद सभेला सुरुवात झाली. आम आदमी पार्टीतर्फे मागच्याच आठ-दहा दिवसांपूर्वी दिनांक 28 मे 2023 ते 6 जून 2023 या कालावधीमध्ये महाराष्ट्र मध्ये आम आदमी पार्टी तर्फे स्वराज्य यात्रा पंढरपूर ते रायगड काढण्यात आली यामध्ये लोकांचे प्रश्न जाणून घेतले आणि त्याच्यावरती वाचा फोडण्यासाठी आता दिनांक 12 जून 2023 ते 18 जून 2023 या दरम्यान मध्ये महाराष्ट्रामध्ये सर्वच ठिकाणी आम आदमी पार्टीतर्फे स्वराज्य संवाद सभा आयोजित केले आहेत.

### स्वच्छ कारभाराबाबत जनजागृती...

»यामध्ये लोकांमध्ये जाऊन कोपरा सभा छोट्या छोट्या सभा आयोजित करून आम आदमी पक्षाची ध्येय धोरणे त्याचबरोबर लोकांबरोबर चर्चा करून स्थानिक प्रश्न समजावून घेणे आणि आम आदमी पार्टीची महाराष्ट्रातील पुढील दिशा काय असेल या संदर्भात लोकांना कल्पना देणे पक्ष प्रवेश करून घेणे नवीन सदयस जोडणे, तसेच, आम आदमी पार्टीने ज्याप्रमाणे पंजाब आणि दिल्लीमध्ये ज्या प्रकारची काम केलेले स्वच्छ कारभार जनसामान्यांना दिलेल्या सुविधा या महाराष्ट्रातील जनतेला या संवादाच्या माध्यमातून सांगण्यात येत आहे.

# नवाजुद्दिन सिद्दिकी करणार 21 वर्षीय अभिनेत्रीबरोबर रोमान्स!

'सेक्रेड गेम्स' फेम नवाजुद्दिन सिद्दिकीने बॉलीवूडमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. अभिनेता त्याच्या आगामी चित्रपटात अभिनेत्री अवनीत कौरबरोबर पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करणार आहे. या दोघांचा 'टिकू वेड्स शेरू' हा चित्रपट गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत होता. आधी हा सिनेमा चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार होता परंतु, काही कारणास्तव आता हा चित्रपट निर्मात्यांनी ओटीटीवर प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारी (१४ जून) या चित्रपटाचा ट्रेलर ॲमेझॉन प्राइमवर रिलीज करण्यात आला.




ऑफिसला यायला सांगितल्यामुळे टीसीएसमधल्या महिला सामूहिक राजीनामा देतायत? कंपनीनं दिलं उत्तर

४९ वर्षीय शेरू आणि २१ वर्षीय टिकूची अनोखी प्रेमकहाणी येत्या २३ जूनला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात शेरू कसा टिकूच्या प्रेमात कसा पडतो आणि त्यानंतर दोघेही अंडरवर्ल्ड, ड्रग्ज आणि रोमान्समध्ये कसे अडकतात हे या ट्रेलरमध्ये दाखवण्यात आले आहे. 'टिकू वेड्स शेरू' चित्रपटाची निर्मिती कंगना राणौतच्या मणिकर्णिका फिल्म्सने केली आहे.

'टिकू वेड्स शेरू'मधील शेरू अभिनेता होण्यासाठी मुंबईत संघर्ष करीत असतो पण, दुसरीकडे त्याचे कुटुंबीय त्याच्यासाठी लग्नाचे बेत आखत असतात, याचवेळी शेरू आणि टिकूची भेट होते. टिकू भोपाळमधून बाहेर पडून मुंबईतील चित्रपटसृष्टीत अभिनेत्री होण्याचे स्वप्न पाहत असते, म्हणूनच ती या लग्नासाठी होकार देते असे या ट्रेलरमध्ये दाखवण्यात आले आहे. 'टिकू वेड्स शेरू' हा एक कॉमेडी-ड्रामा चित्रपट असून

# भर कार्यक्रमात उर्वशी झाली कावरीबावरी

उर्वशी ही तिच्या हटके स्टाईलसाठी नेहमीच चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून ती भारतीय क्रिकेट संघातील स्टार खेळाडू ऋषभ पंतमुळे लाईमलाईटमध्ये आली आहे. आता तर त्या व्हिडिओनं उर्वशीला मोठा धक्काच बसला आहे. त्याची चर्चा सुरु झाली आहे.

उर्वशी ही काही दिवसांत तिच्या आगामी वाल्टेअर वीरय्या नावाच्या चित्रपटामध्ये दिसणार आहे. त्याच्या प्रमोशनसाठी ती विशाखापट्टणमला गेली होती. त्या प्रमोशनल व्हिडिओमध्ये जे काही झाले त्याची चर्चा सुरु झाली आहे. ती बोलायला लागली आणि तेवढ्यात प्रेक्षकांमधून आवाज आला... ऋषभ, ऋषभ. हे सगळं उर्वशीसाठी धक्कादायक होते. व्हायरल व्हिडिओला नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

उर्वशी येणार म्हटल्यावर प्रेक्षकांमध्ये तिला ऐकण्याची मोठी उत्सुकता होती. ती काय बोलणार याकडे सगळ्यांचे लक्षही होते. अशातच प्रेक्षकांमधून मोठ्या चर्चेला सुरुवात झाली. त्यांनी आरडाओरड केली. लोकांनी मोठमोठ्यानं ऋषभच्या नावाच्या घोषणाच दिल्या. त्यामुळे उर्वशीचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता. यापूर्वी देखील अशा घटना घडल्या आहेत.

उर्वशीनं तर आश्चर्य व्यक्त केले आहे. तिच्या त्या व्हिडिओवर नेटकऱ्यांच्या भन्नाट प्रतिक्रिया आल्या आहेत. ती म्हणते, चिरंजीवी यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळते आहे याचा आनंद आहे. चिरंजीवी याचा अर्थ आहे अमर...ते त्यांच्या चाहत्यांसाठी अमर आहेत. त्यांना चाहत्यांचे खूप प्रेम मिळते. असं प्रेम की ज्यामुळे



# भूतकाळाची सावली बदलणार भविष्यकाळाची दिशा!

'प्रतिशोध'- झुंज अस्तित्वाची ही मालिका लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्याची पहिली झलक प्रेक्षकांना पाहायला मिळते आहे. निरनिराळ्या चित्रपटांमधून आणि मालिकांमधून वेगवेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणारे अमोल बावडेकर आता एका वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येणार आहेत.

'प्रतिशोध' या नव्या कोऱ्या मालिकेतून अमोल बावडेकर तृतीयपंथी आईची भूमिका साकारणार आहे. ममता असे या व्यक्तिरेखेचे नाव आहे. अमोल बावडेकरबरोबर पायल मेमाणे ही गुणी अभिनेत्रीसुद्धा पाहायला मिळणार आहे. ती ममताच्या मुलीची म्हणजेच दिशाची व्यतिरेखा साकारताना दिसणार आहे.

प्रतिशोध ही मालिका आई आणि मुलगी यांच्या विशिष्ट नात्यावर भाष्य करणारी थरारक मालिका आहे. भूतकाळातील काही विशिष्ट गोष्टींमुळे ममता आणि दिशा यांना यांच्या भविष्यात कोणत्या अडचणींना सामोरं जावं लागणार आहे, हे आपल्याला या मालिकेतून पाहायला मिळेल.



एक आगळंवेगळं कथानक असलेली ही मालिका प्रेक्षकांना येत्या 16 जानेवारीपासून रात्री 10 वाजता पाहायला मिळणार आहे. 'प्रतिशोध' - झुंज अस्तित्वाची ही नव्या पठडीतली मालिका प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेते आहे. या मालिकेत तृतीयपंथी आई आणि दिशा नावाची मुलगी यांचं नातं उलगडणारी आहे आणि त्यांच्या संघर्षाची कहाणीही या मालिकेतून दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

नव्या मालिकेतील अमोलची तृतीयपंथीची भूमिका त्याच्यासाठी आव्हानात्मक ठरलेली आहे. अशा धाटणीची भूमिका प्रथमच साकारण्याची संधी मिळाल्याने तो या भूमिका साकारण्यासाठी उत्सुक आहे. मालिकेची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. हे आगळंवेगळं कथानक पाहून प्रेक्षकांनी या मालिकेचं स्वागत केलं आणि अमोलच्या भूमिकेला पसंतीही दर्शवली. अरुण नलावडे आणि अक्षय वाघमारे हे कलाकारही या मालिकेतून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहेत.

# बॉलिवूडच्या श्रद्धा कपूरला 'मिसळ'ची भुरळ!

मराठमोळ्या पदार्थांनी आज सगळ्यांना वेड लावलं आहे. रितेश देशमुखची पत्नी जिनिलिया देशमुखलादेखील पिठलं भाकरी आवडते. तिच्याप्रमाणेच इतर बॉलिवूडच्या कलाकरांना मराठी पदार्थ आवडतात. स्त्री चित्रपटातून प्रेक्षकांची मन जिंकणारी अभिनेत्री श्रद्धा कपूर अस्सल महाराष्ट्रीय आहे. तिची आई मराठी असून वडील पंजाबी आहेत, मात्र घरात ती अस्खलित मराठीत बोलते.

नुकताच तिने एक फोटो शेअर केला आहे.

नाशिक, ठाणे, पुणे कुठची मिसळ सर्वात उत्तम असा एका सध्या वाद सुरु झाला आहे. अभिषेक बच्चनला देखील ठाण्याच्या मामलेदार मिसळ आवडते. श्रद्धा कपूरनेदेखील मिसळ पावचा आनंद लुटत फोटो शेअर केला आहे, ज्यात ती मिसळ पाव खात आहे, WOW मिसळ पाव असा कॅप्शन दिल आहे. श्रद्धा कपूर मराठी सण साजरे करत असते, तसेच अनेकदा पत्रकार परिषदेत मराठीत संवाद साधत असते.श्रद्धा कपूर ही नेहमीच तिच्या ग्लॅमरस अंदाजामुळे चर्चेत असते. श्रद्धा कपूरची झलक नुकत्याच 'भेडिया' चित्रपटातील 'ठुमकेश्वरी' या गाण्यात दिसली होती. लवकरच ती आता लव रंजन यांच्या आगामी चित्रपटात झळकणार आहे.



# भारताचा इंग्लंडचा दौरा जाहीर!

## » पाच कसोटी सामने खेळवण्यात येणार

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**महेंद्रसिंग धोनीने भारताला विश्वचषक जिंकवून दिला नाही तर वर्ल्ड कपचा हिरो वेगळाच आहे. धोनीवर टीका करत गौतम गंभीरने कोणाला विश्वचषकाचा हिरो असल्याचे सांगितले आहे : भारताने WTC FINAL गमावली आणि त्यानंतर काही जणांनी महेंद्रसिंग धोनीची स्तुती करायला सुरुवात केली. पण धोनीची स्तुती करणाऱ्या या सर्वांना आता भारताचा माजी सलामीवीर गौतम गंभीरने चांगलीच चपराक दिली आहे. .**



भारताला नुकताच इंग्लंडमध्ये पराभव पत्करावा लागला आहे. त्यानंतर आता भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच कसोटी सामन्यांची मालिका होणार असल्याचे समोर आले आहे. भारताला इंग्लंडमध्ये आता WTC FINAL मध्ये मानहानीकारक पराभव पत्करावा लागला. पण आता भारताचा इंग्लंड दौरा जाहीर झाला आहे. या दौऱ्यात आता पाच कसोटी सामने खेळण्यात येणार आहेत.

इंग्लंडचा दौरा हा भारतासाठी महत्वातता असतो. यापूर्वी भारताला संघ २०२१ साली करोनानंतर इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला होता. त्यावेळी पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार होती. पण चार कसोटी सामन्यांची मालिकाच खेळवण्यात आली होती. कारण पाचव्या सामन्यापूर्वी भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांना प्रथम करोना झाला होता आणि त्याचा प्रसार भारतीय संघातील सदस्यांना झाला होता. त्यामुळे हा कसोटी सामना त्यांना स्थगित करावा लागला होता. पण त्यापूर्वी झालेल्या चार सामन्यांत भारताने बाजी मारली होती.

गेल्या दौऱ्यातील पहिला कसोटी सामना हा अनिर्णित राहीला होता. त्यानंतर दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताने बाजी मारली होती आणि हा सामना त्यांनी तब्बल १५१ धावांनी जिंकला होता. त्यानंतर तिसऱ्या कसोटी सामन्यात भारताला मानहानीकारक पराभव पत्करावा लागला होता. कारण या सामन्यात इंग्लंडने भारताला तब्बल एक डाव आणि ७६ धावांनी पराभूत केले होते. पण भारताने या पराभवाचा बदला हा चौथ्या कसोटीत घेतला होता. भारताने चौथा कसोटी सामना हा १५७ धावांनी जिंकला होता आणि मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली होती. त्यानंतर पाचव्या सामन्यात नेमकं काय घडतं, याची उत्सुकता सर्वांना होती. पण पाचवा सामना हा भारतीय संघात करोनाचा शिरकाव झाल्यामुळे होऊ शकला नव्हता.

आता भारतीय संघ पुन्हा इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार आहे आणि पाच कसोटी सामने खेळणार आहे. या दौऱ्यातील पाच कसोटी सामने हे लॉर्ड्स, दी ओव्हल, एजबस्टन, हेडिंग्ले आणि ओल्ड ट्रॅफर्ड या मैदानात होणार आहेत.

### भारताने नाकारलं तरी...

» आर. अश्विन हा जगभरातील कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानावर होता. पण तरीही भारतीय संघाने त्याच्यावर अन्याय केला आणि त्याला WTC FINAL मध्ये संधी दिली नाही. पण भारताने जरी अश्विनला नाकारले असले तरी आयसीसीने मात्र त्याला गौरव केला आहे. रोहित शर्माने जेव्हा फायनलसाठी संघ जाहीर केला तेव्हाच सर्वांना धक्का बसला होता. कारण रोहितने यावेळी भारतीय संघातून जगातील अव्वल गोलंदाज आर. अश्विनला संघाबाहेर केले होते. त्यावेळी रोहितवर जगभरातून टीका झाली होती. कारण अश्विन हा जगातील पहिल्या क्रमांकाचा गोलंदाज तर होताच, पण तो उपयुक्त फलंदाजीही करू शकतो. कसोटी क्रिकेटमध्ये त्याने शतकही झळकावले आहे. त्यामुळे त्याची भारताला या सामन्यात चांगलीच मदत झाली असती. पण रोहितने त्याला संघातून वगळले आणि भारतीय संघाला त्याचा मोठा फटका बसला. पण आयसीसीने मात्र आता त्याला मानाचे पान दिले आहे.

---

## वर्ल्डकपआधी राहुल द्रविडची उचलबांगडी होणार? कोचिंग स्टाफमध्ये बदलाचे संकेत

। पॅरिस।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

BCCI WARNING TO RAHUL DRAVID: WTCच्या पराभवानंतर BCCI ॲक्शन मोडमध्ये आहे. मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांना इशारा देण्यात आला असून २०२३च्या विश्वचषकापूर्वी त्यांची हकालपट्टी होण्याची शक्यता आहे.

२०१३ साली शेवटच्या वेळी आयसीसी ट्रॉफी जिंकणारा भारतीय संघ आयसीसीच्या स्पर्धेत अंतिम फेरीत पोहोचण्यात यशस्वी ठरला, मात्र आजपर्यंत त्यांना विजेतेपद काही मिळवता आले नाही. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (WTC) अंतिम सामन्यातील पराभवानंतर भारतीय संघाच्या खेळाडूंसोबतच संघाच्या सपोर्ट स्टाफलाही टीकेला सामोरे जावे लागत आहे. त्याचवेळी, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आता WTC फायनलमधील पराभवानंतर संघाच्या सपोर्ट स्टाफला इशारा केला आहे.

बीसीसीआयच्या सूत्राने एका स्पोर्ट्स वेबसाईटशी बोलताना सांगितले की, गोलंदाजी प्रशिक्षक, फलंदाजी प्रशिक्षक यांच्यासोबत



सपोर्ट स्टाफबाबत चर्चा होणार आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील पराभवाच्या कारणांचाही आढावा घेतला जाईल. गोलंदाजी आणि फलंदाजी प्रशिक्षकावर बोर्ड कारवाई करू शकते. WTC फायनलमधील भारतीय संघाच्या कामगिरीनंतर इनसाइड स्पोर्ट्समध्ये प्रकाशित झालेल्या बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याच्या विधानानुसार, एकदिवसीय विश्वचषक २०२३ला लक्षात घेऊन, या पराभवानंतर फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोर आणि गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हांबरे यांचे स्थान काय असेल हे ठरवले जाणार आहे.

## सिंधू, प्रणॉय उपउपांत्यपूर्व फेरीत, दुहेरीत गायत्री-ट्रिसा जोडीचा पराभव

### » इंडोनेशिया खुली बॅडमिंटन स्पर्धा :

। जकार्ता ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारताचे आघाडीचे खेळाडू पी. व्ही. सिंधू आणि एच. एस. प्रणॉय यांनी इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत मंगळवारी पहिल्या फेरीचा अडथळा पार करताना उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.**

भारताचे आघाडीचे खेळाडू पी. व्ही. सिंधू आणि एच. एस. प्रणॉय यांनी इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत मंगळवारी पहिल्या फेरीचा अडथळा पार करताना उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सिंधूला गेल्या दोन स्पर्धेत पहिल्या फेरीत आव्हान गमवावे लागले होते. प्रणॉयही मलेशियातील विजेतेपदानंतर लय गमावून बसला होता.



इंडोनेशिया खुल्या या सुपर १००० दर्जाच्या मानांकन स्पर्धेत सिंधूने सलामीला ३८ मिनिटांत यजमान देशाच्या ग्रेगोरिया मरिस्का तुनजुंगचा २१-१९, २१-१५ असा पराभव केला. सिंधूचा ग्रेगोरियाविरुद्धचा पहिलाच विजय ठरला. यापूर्वी माद्रिद स्पर्धेच्या अंतिम आणि मलेशिया स्पर्धेच्या उपांत्य फेरीत सिंधूला ग्रेगोरियाकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. ऑफिसला यायला सांगितल्यामुळे टीसीएसमधल्या महिला सामूहिक राजीनामा देतायत? कंपनीनं दिलं उत्तर

पहिल्या गेममध्ये सिंधूला ग्रेगोरियाकडून चांगले आव्हान मिळाले. मात्र, सिंधूने आपल्या उंचीचा पुरेपूर वापर करून घेत ओव्हरहेड फटक्यांनी ग्रेगोरियावर वर्चस्व राखले. सिंधूने गेमच्या मध्याला ११-१० अशी आघाडी मिळवली. त्यानंतर सिंधूने सातत्याने ग्रेगोरियाला चुका करण्यास भाग पाडले आणि पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये मात्र सिंधूने एकतर्फी वर्चस्व राखले. सिंधूची गाठ आता तिसऱ्या मानांकित ताय त्झू यिंगशी पडणार आहे. पुरुष एकेरीत प्रणॉयने जपानच्या केंटा निशिमोटोचे आव्हान २१-६, २१-१४ असे ५० मिनिटांत सहज परतवून लावले. त्याच्यापुढे आता हाँगकाँगच्या एन्जी लॉन्ग अँगसचे आव्हान असेल.

पुरुष दुहेरीत भारताच्या सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टीने विजयी सुरुवात करताना यजमान देशाच्या मार्कस फेर्नाल्डी गिडेऑन-केव्हिन संजया सुकुमुल्जो जोडीचा २१-१२, ११-७ असा पराभव केला. दुसऱ्या गेममध्ये प्रतिस्पर्धी जोडीने दुखापतीमुळे माघार घेतली.